Bal Bharati
PUBLIC SCHOOL
RGPPL RATNAGIRI

Date : 28.09.2023.

## CIRCULAR

Dear Parents,

As per the Government circular no. GAD/49011/2/2023/GAD/DESK-29, dated 27/09/2023 from Mantralaya, Mumbai and circular no.1/3472/2023, dated 27/09/2023 from the office of the District Education Officer (Secondary), Zilha Parishad, Ratnagiri, the school will remain closed on 29/09/2023 in view of Eid-E- Milad. Todays Holiday (28/09/2023) is on account of Anant Chaturdashi.

School will be working as per normal time table from 30th September 2023.

Surajit Chatterjee
Principal

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांकः- **GAD-49011/2/2023/GAD/DESK-29.**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७ सप्टेंबर, २०२३.

अधिसूचना

क्रमांक **GAD-49011/2/2023/GAD/DESK-29.**- शासनाने सन २०२३ सालासाठी राज्य शासकीय कार्यालयांना एकूण २४ सार्वजनिक सुट्टया परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा २६) कलम २५ करिता अधिसूचना क्र.सार्वसु ११२२/प्र.क्र.११७/कार्या-२९, दि.०२ डिसेंबर, २०२२ अन्वये अधिसूचित केल्या आहेत.

२. राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या २४ सार्वजनिक सुट्टयांमध्ये ईद-ए-मिलाद या सणाची सुट्टी गुरुवार, दि.२८ सप्टेंबर, २०२३ रोजी दर्शविण्यात आलेली आहे. ईद-ए-मिलाद हा मुस्लिम धर्मियांचा सण मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात साजरा करत असतात. यावेळी जुलूस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तथापि यावर्षी गुरुवार, दि.२८ सप्टेंबर, २०२३ रोजी हिंदु धर्मियांचा अनंत चतुर्दशी हा सण आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी राज्यात सर्वत्र सार्वजनिक गणेश मुर्तीची मोठी मिरवणूक काढण्यात येते व नंतर तिचे विसर्जन करण्यात येत असल्याने हिंदु बांधवांची मोठी गर्दी जमा होत असते. यामुळे दोन्ही समाजामध्ये शांतता व सामाजिक सलोखा कायम राहण्याच्या हेतूने ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी ही गुरुवार, दि.२८ सप्टेंबर, २०२३ ऐवजी शुक्रवार, दि.२९ सप्टेंबर, २०२३ रोजी जाहीर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | भारतीय सौर दिनांक | वार |
|---|---|---|---|---|
| १ | ईद-ए-मिलाद | २९ सप्टेंबर, २०२३ | ७ अश्विन, शके १९४५ | शुक्रवार |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रो. दि. कदम-पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

जिल्हा परिषद रत्नागिरी
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, माळनाका
रत्नागिरी - ४१५६१२
माध्यमिक शिक्षण विभाग

दुरध्वनी क्रमांक - ०२३५२-२२०८४५ ई मेल आय डी - coseeratnagiri@gmail.com

जा.क्र.रजिप/शिक्षण/माध्यमिक/ संकिर्ण /माध्य- ०१ / ३४७२/ २०२३ दिनांक :- २७ / ०९ / २०२३

प्रति,

प्राचार्य/ मुख्याध्यापक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालय (सर्व माध्यम)
जि. रत्नागिरी.

विषयः- सुटयांच्या बदलाबाबत.

संदर्भः- महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दिनांक २७/०९/२०२३

वरील विषयान्वये शैक्षणिक वर्ष सन २०२३ -२०२४ करिता जिल्हयातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना किरकोळ व मोठया सुटयांबाबत परिपत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक २८/०९/२०२३ रोजी अंनत चतुर्दशी / ईद —ए — मिलादची सुट्टी जाहीर करण्यात आली होती. परंतु शासनाने उपरोक्त संदर्भानुसार ईद —ए - मिलाद ची सुट्टी दिनांक २९/०९/२०२३ रोजी जाहीर केलेली आहे.

तथापि शैक्षणिक वर्ष सन २०२३ -२०२४ करिता जाहीर केलेल्या सुटयांचे दिवस वाढत असल्याने शालेय दिवस भरून काढण्यासंदर्भात स्वतंत्र आदेश काढण्यात येईल. तरी शनिवार दिनांक ३०/०९/२०२३ रोजी सर्व माध्यमाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक सर्व माध्यमाच्या शाळा सुरू राहतील याची नोंद घ्यावी.

(सुवर्णा सावंत)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद रत्नागिरी